International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.935
Vol.6 No.1 Sept – Oct 2018

# स्वतंत्र भारताकडून अपेक्षा

डॉ. उषा पाटील

महावीर कॉलेज, कोल्हापूर

**प्रस्तावना :**

भारताला मिळालेले स्वातंत्र म्हणजे भारतीयांच्या दृष्टीने आशा-आकांक्षांच्या नव्या पर्वाचा आरंभ होता. आर्थिक मागासलेपणा,दारूण दारिद्र,जवळपास संपूर्णच निरक्षरता देशभर, पसरलेली रोगराई,सामाजिक विषमता व अन्याय यांचा वारसा मागे ठेऊन इंग्रज निघून गेले होते. 15 ऑगस्ट 1947 हा या मोहिमेचा शुभारंभ होता. देशातील वसाहतवादाचा हा शेवट होता. आतापर्यंत अनेक वर्षापासून सहन केलेले मागासलेपण हे आता दूर करायचे करायचे होते. तसेच स्वातंत्रसंघर्ष सुरू असताना समाजातील लोकांना दिलेली आश्वासने आणि त्या दृष्टीने समाजातील लोकांच्या उंचावलेल्या अपेक्षा पूर्ण करण्याचा हा काळ होता. राष्ट्र-उभारणीचे कार्य भारतीय जनतेने व या कार्यात सहभागी झालेल्या अनेक खंद्या शूरवीर धुराणींनी,स्वातंत्र संग्रामात सक्रीय सहभागी झालेल्या स्वातंत्रसैनिकांनी मोठया जोशाने ,निर्धाराने आणि स्व-सामर्थ्यावरील आत्मविश्वासाने हाती घेतले. स्वातंत्र घोषित होण्याच्या आदल्या दिवशी म्हणजे 14ऑगस्टला जवाहरलाल नेहरू यांनी **नियतीशी संकेत** म्हणून प्रसिध्द असलेले जे भाषण केले,त्यात देशाच्या उसळत्या मनोभावनेचे प्रतिबिंब पडले होते.

ज्या नवभारताची उभारणी भविष्यात करावयाची होती. जो नवभारत साकारावयाचा होता. त्याच्या रंगरूपाबद्दल लोकांच्या मनोधारणा अगोदरच तयार होत्या. त्याचा फायदा उभारणीच्या कार्यास मिळाला. राष्ट्रीयत्व,धर्मनिरपेक्षा व लोकशाही मूल्ये आणि जलद गतीने आर्थिक विकासाची व आमुलाग्र सामाजिक सुधारणांची उद्दिष्टे या बाबतच्या त्या धारणा होत्या. ही मुल्ये व उद्दिष्टे साध्य करण्याच्या मार्गावरून गेली 65 वर्षे राष्ट्रीय चळवळी सातत्याने वाटचाल करीत आहेत.

स्वतंत्र भारतासमोर देशातील ऐक्य जोपासणे,व ते दृढ व वृध्दिगत करणे,सामाजिक परिवर्तनाच्या मार्गाने राष्ट्र-बांधणीची,प्रकिया पुढे चालविणे व त्यातून सामर्थ्य संपन्न अशा भारताची एक **'एकसंघ राष्ट्र'** म्हणून उभारणी करणे हे एक महत्वाचे आव्हान होते. हे आव्हान पेलताना असे लक्षात आले की,देशात ऐक्य आहे असे गृहित धरता येणार नाही. कारण देशात मोठया प्रमाणावर प्रादेशिक, भाषिक, वांशिक व धार्मिक विविधता

आहे.हे ओळखून व हे सत्य स्विकारूनच देशातीाल निरनिराळया प्रादेशिक विभागांना व जनसमूहांना एकात्म भारताच्या छत्राखाली पुरेसे व अश्वासक स्थान देऊन आणि लोकांच्या वेगवेगळया अस्मितांना मान्यता व वाव देउन 'एक संघराष्ट्र' म्हणून भारताचा ,भारतीयत्वाचा विकास घडविणे हे मोठे आव्हानात्मक काम आहे.ही प्रकिया दीर्घकाळ चालेल व तिच्याबरोबर भारतीयत्वाची संकल्पना सतत उजळत रहावी लागेल.याची सर्वांनाच नव्याने जाणीव होऊ लागली.

समाजाच्या विविध क्षेत्रातही वेगाने परिवर्तन घडविणे आवश्यक होते.महात्मा गांधीनी अस्पृश्यतेविरूध्द मोहिम राबविली होती.देशाच्या वेगवेगळया भागात जातीयतेविरूध्द लहान सहान चळवळी चालूच होत्या.त्यातल्या त्यात ग्रामीण भागात जातीयतेचा पगडा जास्त होता.अस्पृश्यता सर्रास पाळली जात होती.कनिष्ठ समजल्या गेलेल्या जाती अजून आपल्या स्वावलंबनाच्या दृष्टीने सक्षम झाल्या नव्हत्या व त्याच्यांत पुरेशी जागृतीही झालेली नव्हती घरात पुरूषांचे वर्चस्व होते.स्त्रियांवर अनेक बंधने लादली गेली होती.स्त्रियांना वडिलोपार्जित मालमत्तेत हक्क नव्हता.तसेच घटस्फोटाचाही हक्क नव्हता.शिक्षणापासूनही त्यांना वंचित ठेवले गेले होते.हिंदू व मुसलमान दोन्ही समाजात बहुपत्नीत्वाची चाल अस्तित्वात होती.निरक्षरता व अज्ञान याचे साम्राज्य सर्वत्र पसरलेले होते.सन **1951** मध्ये देशातील साक्षरता फक्त **25%** पुरुष साक्षर होते तर स्त्रियांमधील साक्षरता केवळ **7.9%** इतकी होती. स्वातंत्र चळवळीच्या काळात लोकांमध्ये लोकशाही समाज व्यवस्थेच्या जाणीवांचे बीजारोपन झाले होते.या जाणीवा आता अधिक प्रगल्भ आणि प्रत्येकाच्या मनामनात रूजविण्याचे आव्हान राष्ट्र उभारणीत उग्रभागी असणा-या नेत्यासमोर होते.कोणत्याही अविकसित देशात लोकांना लोकाशाहीपेक्षा अन्नाची गरज अधिक असते.आणि जी लोकशाही त्यांना पुरेसे अन्न,वस्त्र व निवारा देत नाही ती लोकशाही त्यांच्या दृष्टीने काही कामाची नसते.

आपल्या देशातील विविधतेमुळे राष्ट्रीय ऐक्यभावना जोपासण्यासाठी लोकशाही प्रधान राजकीय व्यवस्था अमंलात आणणे आवश्यक आहे.याचा अंदाज तत्कालीन नेत्यांना आला होता.आर्थिक विकास व लोकशाहीप्रधान राजकीय व्यवस्था विकसित करीत असताना सामाजिक परिवर्तनाच्या कार्यासही वेग देणे हेही महत्वाचे होते.त्यावेळी अस्तित्वात असलेल्या अनेक समस्या 'आ'वासून उभ्या होत्या.गरीबी,दारिद, खालावलेली आर्थिक स्थिती,जातीय भाषिक प्रांतिय व धार्मिक विषमता इ.घटकांवर लक्ष केंद्रित करून परिवर्तनाच्या चळवळींना गतीमान करणे गरजेचे होते.दारिद्रय दूर करून जनतेचे राहीमान उंचविणे आवश्यक होते. तसेच जनतेमध्ये लोकाशाही विचारांच्या सामाजिक जाणीवा रूजविण्याची गरज होती.

भारताचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी व्हावा यासाठी **1952** पासून पंचवार्षिक योजनामधून आकृतीबंध विकासाची सुरूवात झाली.स्वतंत्र भारतामध्ये गरीबी दूर करणे,निरक्षरता संपवून साक्षर भारताची

निर्मिती करण्यासाठी ठोस पावले उचलणे, साक्षराना रोजगार उपलब्ध करून देणे. सर्व सामन्य जनतेला सर्व सोयीनियुक्त अशा आरोग्य सेवा बहाल करणे. जास्तीत जास्त मुले शिक्षण घेण्याच्या प्रक्रियेत सहभागी व्हावीत यासाठी हेतूपूर्वक प्रयत्न करणे,शेती ही आधुनिक पध्दतीने करावी यासाठी शेतक-यांना प्रोत्साहन व प्रेरणा देणे. औद्योगिक विकासासाठी अनुकूल वातावरण निर्मिती करणे अशी अनेक महत्वपूर्ण आव्हाने स्वतंत्र भारतासमोर होती. पंचवार्षिक योजनेच्या मदतीने टप्प्या टप्प्याने विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या प्रयत्नात आज भारत देश कुठेपर्यंत पोहचला आहे. याचे मुल्यमापन करताना या **65** वर्षाच्या कालावधीत भारताने काय कमावले?काय गमावले?याचे विश्लेषणात्मक मूल्यमापन या लेखात केले आहे. भविष्यकाळात कोणती कामे करावयाची आहेत आणि भवितव्य काय आहे?हे पाहणे अगत्याचे आहे.

**शेती व औद्योगिक विकास ः**

स्वतंत्रप्राप्तीनंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशातील सर्व नागरीकांना समान संधी देणारा व सुसंस्कृत-निरोगी वातावरण असलेला,सर्वाना समान संधी हे तत्व प्रत्यक्ष आचरणात उतरवणारा समाज घडविणे हेच ध्येय समोर ठेऊन वाटचाल सुरू केली. स्वतंत्र भारताचा आर्थिक पाया कसा असावा,सामाजिक व राजकीय बावतीत काही मूलभूत बदल घडवून आणण्याची बांधीलकी याबद्दल सखोल विचार मंथन केले गेले. यामध्ये प्रामुख्याने सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण,गरीबी व मध्यमवर्गीय लोकांना कर माफी करणे मिठावरील कर कमी करणे शेतसारा व जमिनीवरील कर कमी करणे शेतक-याना कर्ज सूट देणे व त्यांना स्वस्त दरात कर्ज उपलब्ध करून देणे शेतीवरील कुळांचे हक्क सुरक्षित करणे अंतिमतः जमिनदारी नष्ट करणे व 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व आचरणात आणणे कामगारांना निर्वाहास पुरेसे वेतन हक्काने मिळवून देणे व त्यांचे कामाचे तास कमी करणे कामगारांना व शेतक-यांना आपापल्या संघटना उभारण्याचा हक्क देणे कायदा व सुव्यवस्था राखणा-या यंत्रणेत सुधारणा करणे अशा सुधारणाांचा त्या कार्यक्रमात समावेश होता.

**स्वतंत्र भारतातील स्त्रिया ः**

स्वातंत्रानंतरच्या काळात भारतीय स्त्रियांचा कायदेशीर,राजकीय,शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने हेतूपुर्वक प्रयत्न केले गेले. घटनेने स्त्रियांना पूर्ण समता बहाल केली. राष्ट्रीय चळवळीने कित्येक वर्षापूर्वी देलेले आश्वासन पूर्ण झाले, पुरूषांबरोबर स्त्रियांनाही शिक्षण किंवा मालमत्ता किंवा मिळकत या अटींशिवाय मताचा अधिकार मिळाला. ज्या मताधिकारासाठी पाश्चात्य स्त्रियांना दीर्घकाळ व प्रखर लढा द्यावा लागला,तो मतदानाचा अधिकार भारतीय स्त्रियांना प्राधान्याने देण्यात आला. त्याचप्रमाणे **1944** मध्ये हिंदू

कोड-बिलाचा मसुदा तयार केला होता.स्वातंत्रप्राप्ती नंतर कायदा मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समतीने एक विधेयक सादर केले होते. त्यानुसार लग्नाचे आणि संमती वय वाढविण्यात आले.एक-पत्नी पध्दतीस मान्यता दिली गेली. स्त्रियांना घटस्फोटाचा,निर्वाचा आणि वारसाचा अधिकार मिळाला आणि हुंडयाला स्त्रीधन किंवा पत्नीची मालमत्ता मानण्यात आले.कॉंग्रेसचे बहुसंख्य अनुयायी,स्त्री-कार्यकर्त्या आणि समाजसुधारकांचा या विधेयकास भक्कम पाढिंबा असला तरी समाजातील परंपरानिष्ठ लोकांनी विरोध केला.शेवटी त्याचे चार भाग पाडून पुढील चार वेगळे कायदे करण्यात आले.1)हिंदू विवाह कायदा 2)हिंदू वारसाहक्क कायदा 3)हिंदू अज्ञानदशा आणि पालकत्व कायदा 4)हिंदू दत्तक आणि प्रतिपाळ कायदा.

काही कायदेशीर अधिकार प्रत्यक्ष वापरात आले असले तरी अन्य अधिकार कागदावरच राहिले आहेत.हुंडाबळी,बलात्कार आणि दारूशी संबंधित कौटुंबिक हिंसा या पुरूषी अन्यायांच्या दृश्य परिणामांना आज स्त्रियांना मोठया प्रमाणात तोंड दयावे लागत आहे. **2005** साली भारत सरकारने कौटुबिंक हिंसाचाराच कायदा पास केला. पण आज जेव्हा या हिंसाचारातील बळींची संख्या पाहिली तर असे आढळून आले आहे की, खूपच कमी केसेस नोंदविल्या गेल्या आहे. याचा अर्थ असा नाही की, कायदाच्या भितीने हे प्रमाण कमी झाले आहे.पण स्वतःच्या घरातील लोकांची कशाला बदनामी करायची किंवा सासरच्या घरातील लोकांचा धाक असतो.यामुळे ही कौटुंबिक हिंसा मोठया प्रमाणात होऊनही कोणालाही गंभीर स्वरूपाची शिक्षा अजून झालेली नाही.त्याताच सध्याचा बहुचर्चित स्त्री-भुण हत्येचा प्रश्न. हजारो मुली जन्माला येण्या अगोदरच मारल्या जात आहेत.स्त्री जातीची आणखीन कुर थट्टा ती कोणती?

**जातीयता ः**

स्वातंत्र प्राप्तीनंतर जातीवर आधारित अन्याय आणि विषमता दुर करण्यासाठी मोठे उपकम सुरू करणे आवश्यक होते.राज्यघटनेने धर्म,लिंग,भाषा आणि वंश यांतील भेद लक्षात न घेता वर्गीकृत जातीसह सर्व नागरीकांना राजकीय अधिकार दिले.धर्म,जात किंवा लिंग या मुद्यांवर भेदभाव करण्यास प्रतिबंध करून राज्यघटनेने सामाजिक विषमता दूर करण्याच पाया घातला.अनुसूचित जाति-जमातींना शैक्षणिक संस्था,नोक-या व विधीमंडळे यांच्यात राखीव जागा ठेऊन राष्ट्रीय चळवळीने दलित जनतेला दिलेले वचन राज्यघटनेने पुर्ण केले. अस्पृश्यता पाळणे हा घटनेतील कलम 17 नुसार गुन्हा ठरविण्यात आला.परंपरागत उच्च-नीच जाती-व्यवस्थेविरूध्द मात्र आंदोलन झाले नाही,त्यामुळे जातीभेद पाळणे व पद-दलितांवर अन्याय करणे चालूच राहिले. निवडणूकांमध्ये यश मिळविण्यासाठी व अन्य राजकीय हेतू साध्य करण्यासाठी 'जात'या घटकाचा सर्रास वापर केला जाऊ लागला.गेल्या शतकाच्या पन्नाशीतच सामाजिक सुधारणांचा जोर कमी झाला.सामाजिक

भेदभाव दूर करने,धर्म जात भाषा वंश या मुद्यांच्या आधारे होणारे शोषण थांबविणे आणि जबर आर्थिक विषमता दूर करणे हे विषय राष्ट्रीय ऐक्याच्या कार्यकमात आजतागायत अत्यंत दुबळे राहिले आहे .

**धर्मनिरपेक्षता व राष्ट्रीय ऐक्य**

राष्ट्रीय चळवळ आरंभाकाळापासूनच धर्मनिरपेक्षतावादी होती . धर्मनिरपेक्षतेची व्यापक स्वरूपाची व्याख्या करण्यात आली होती . राजकारणापासून ते राज्यसत्तेपासून धर्म वेगळा ठेवणे,धर्म ही व्यक्तिगत बाब मानणे,सर्व धर्माच्या बाबतीत सरकारने साररूाच आदर बाळगणे पण तटस्थ राहणे,वेगवेळया धर्माच्या अनुयायांच्या बाबतीत भेदभाव न करणे आणि जातीयतेला सक्रिय विरोध करणे या गोष्टी धर्मनिरपेक्षतेमध्ये समाविष्ट करण्यात आल्या . राजकीय, आर्थिक आणि भावनात्मक द्दष्टया भारतीय ऐक्य समर्थ बनविण्यात आणि राष्ट्रनिर्मितीच्या क्लिष्ट प्रक्रियेला चालना देण्यात भारताला मोठे यश प्राप्त झाले आहे . या प्रक्रियेत भारतात असणारी अफाट विविधतेला कोणताही धोका पोहोचला नाही . प्रचंड सामाजिक मंथनातून निर्माण झालेल्या ताणताणावांमुळेही,'सर्व भारतीय एक आहोत'या भारतीयत्वाच्या जाणिवेस व एकात्मतेच्या भावनेस तडा गेली नाही .

**विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास** ः

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारावर समाजाची प्रगति साधाण्याचा हेतूपूर्वक प्रयत्न स्वातंत्र प्राप्तीनंतर ख-या अर्थाने सुरू झाला . याचाच एक भाग म्हणून **4** जानेवारी,**1947** रोजी ‘राष्ट्रीय पदार्थविज्ञान प्रयोगशाळेची’कोनशिला बसविण्यात आली . त्यापाठोपाठ विविध क्षेत्रातील संशोधनासाठी **17** राष्ट्रीय प्रयोगशाळांचे जाळे उभारण्यात आले . भारतातील मोठया शहरामध्ये तंत्रज्ञान विषयक प्रशिक्षण देण्यासाठी तातडीने व्यवस्था करण्यात आली . सन **1952** मध्ये ‘मॅसेच्युसेट्स इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी’च्या धर्तीवर भारतातील पाच तंत्रवैज्ञानिक संस्थापैकी पहिली खरगपूर येथे उभारण्यात आली आणि नंतर मद्रास मुंबई कानपूर आणि दिल्ली येथे प्रत्येकी एक या प्रमाणे आणखी चार संथ्सा स्थापन करण्यात आल्या .

भारताने अवकाश संशोधनातही पदापर्ण केले . सन**1962** मध्ये देशात ‘अवकाश संशोधनाची’भारतीय-राष्टीय समिती **इस्त्रो** स्थापन करण्यात आली . देशाच्या संरक्षणविषयक गरजांबाबत हळूहळू स्वंयपूर्णता यावी या द्दष्टीने पावले उचलली गेली . विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारावरील प्रगति इथेपर्यतच होती असे नाही तर राजीव गांधीच्या कारकिर्दीतील सर्वात संस्मरणीय बाब म्हणजे संगणकाचा कार्यकमाला दिलेले महत्व . कार्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये संगणकाच्या उपयोगाला चालना मिळाली . भविष्यावर नजर ठेऊन

राजीव गांधीनी संगणकक्षेत्राला सक्रिय साहाय्य केले; त्यामुळे भारत आज या क्षेत्रात अग्रेसर असून देशाला त्यातून भरपूर परकीय चलन प्राप्त होत आहे. माहिती व तंत्रज्ञान याशिवाय पर्याय नाही यावर सर्वांचा विश्वास पक्का झाला आहे. दूरसंचार विभाग व संगणक क्षेत्र यामध्ये झालेली प्रगति डोळे दिपवून टाकणारी आहे.

तरीसुध्दा,भारताला सोडवायचे आहेत असे अनेक प्रश्न बाकी आहेत. नव्या सहस्त्राकाच्या पहिल्या दशकात प्रवेस करताना आपल्यासमोर काही नवे प्रश्न उभे आहेत. भाषिक व जातीय दंगली,सांप्रदायिक रक्तपात, इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या हत्या, दहशतवाद, भ्रष्टाचार, प्रदुषण, पर्यावरणाचे महासंकट,आर्थि क विषमता आणि दारिद्र, जातीय पूर्वग्रह, हुंडाबळी, सती, स्त्रीलिंगी अर्भकांची हत्या, वेठबिगारी, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, स्त्रियांविरूध्द पक्षपात, मानवी अधिकारांचे उल्लंघन यासारखे प्रश्न अजून अनुर्त्तीण राहिले आहेत.

मोठया प्रमाणावरील भ्रष्टाचार, गुन्ह्यांमध्ये वाढ आणि राजकारणाचे व पोलिसांचे गुन्हेगारीकरण यांमुळे भारताचा विकास ,लोकशाही आणि नैतिक आरोग्य यांना मोठे धोके निर्माण झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर विविधतेमध्ये एकता आणणे हे अतिशय अवघड व आव्हानात्मक काम आहे. आज **13** वी लोकसभा अस्तित्वात आली आहे. **1989** पासून लोकसभेमध्ये कोणत्याही एका पक्षाला निर्विवाद बहुमत न मिळाल्याने त्रिशंकू सरकारचे राज्य येते,किंवा तीनपेक्षा जास्त पक्ष एकत्र येऊन आघाडी सरकार सत्तेवर येते. अशावेळी शासनाला महत्वाचे निर्णय ठोसपणे घेता येत नाहीत. आज असे अनेक निर्णय आहेत की जे सरकारला घेता आलेले नाहीत. उदा. महिला आरक्षण धोरण,अणुऊर्जा करार,भ्रष्टाचार रोखण्यासाठी येऊ घातलेले जनलोकपाल विधेयक या बाबतीत कोणताही निर्णय एक मताने सरकारला घेता आलेला नाही. इंधनाचे दर तर वाढत आहेत,आघाडी सरकार मधील घटक पक्षच यासाठी विरोधकाची भूमिका घेतात आणि सरकारला अडचणीत आणतात.

अण्णा हजारेंनी एप्रिल **2011** मध्ये जंतर मंतर नवी दिल्ली येथे लोकपाल बिल मंजूर व्हावे यासाठी आमरण उपोषणाचे हत्यार उगारले. त्यावेळी देशातील सर्व सर्व तरूणांनी व जागरूक नागरिकांनी उत्स्फूर्त पाठिंबा दर्शविला. अशा प्रतिसादाची कदाचित आण्णांना अपेक्षा नव्हती. यावरून एक स्पष्ट झाले की, भ्रष्टाचारामुळे सर्व सामान्य जनता किती त्रस्त झाली आहे. देशाच्या कानकोप-यातून आण्णांना पाठिंबा मिळत होता. याचाच एक परिणाम म्हणून शासनाने लोकसभेच्या अधिवेशनात जनलोकपाल बिल मंजूर करण्याचे आश्वासन दिले. पण सरकार बहुमतात नसल्यामुळे अजून हे बिल पास झालेले नाही. आज अनेक मंत्री भ्रष्टाचाराच्या आरोपात अडकले आहेत. सत्ताधारी व विरोधी पक्षातील सर्वच नेते कोणत्यांना कोणत्यातरी घोटाळयात अडकले आहेत. यामुळे कोणत्याही नेत्यावर विश्वास ठेवावा अशी परिस्थिती राहीलेली नाही.

राज्य शासनाची परिस्थितीही काही समाधानकारक नाही. आदर्श घोटाळा,भूखंड, वाळू व तेल माफीयांचे राज्य आहे की काय असा संभ्रम जनमानसात निर्माण झाला आहे. भ्रष्टाचारच शिष्टाचार होऊ पातह आहे. सर्वत्र असुरक्षितता व अशांततेचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यातही आघाडीचेच सरकार असल्यामुळे कोणतीही विकासाची कामे होत नाहीत. जलसिंचन प्रकल्पाची रखडलेली कामे, जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला होणारा विरोध तसेच डॉ. नरेंद्र दाभोळकर हे गेल्या कित्येक वर्षापासून 'अंधःश्रध्दा निर्मूलनाचा कायदा' व्हावा यासाठी मागणी करीत आहेत. पण हा कायदा आजतागयत पास झालेला नाही. असे अनेक निर्णय आघाडी सरकार घेऊ शकलेले नाही. अशा परिस्थितीत देखिल भारतीय जनता आशावादी आहे. एक चैतन्यशील लोकशाहीच या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधून काढेल. स्त्रिया, ग्रामीण गरीब आणि दडपल्या गेलेल्या जाती यांना पुढे चांगले जीवन जगता येईल अशी आशा वाटते.

**संदर्भ ः**

1. सागर, के संपादन (2009) "इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स-स्वातंत्र्योत्तर भारत" पुणे: के सागर प्रकाशन
2. पाटील, व्ही. बी. (2009) "मानवी हक्क" पुणे: के सागर प्रकाशन
3 गांधी, महात्मा (2001) " माझ्या स्वप्नांचा भारत" पवनार (वर्धा): परंधाम प्रकााशन
4 देवधर, य. ना. (2006) " आजकालचा भारत" पुणे: डायमंड प्रकाशन